# प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस
## अभिमत विद्यापीठ

जागतिक महिला दिवस ८ मार्च, २०१८

# जीवन गौरव पुरस्कार

## आदरणीय सिंधुताई विखे पाटील

सहकार क्षेत्रातील नावजलेल्या कुटुंबातील जीवनानुभव व सुसंस्कृत शेतकरी कुटुंबातील जन्म यातून आपले सुजाण व सुसंस्कृत व्यक्तिमत्व आकार पावले. आपण आदर्श महीला, यशस्वी गृहीणी व कुटुंबवत्सल माता म्हणून सुपरिचीत आहातच. मातृशक्तीचा सन्मान करण्यासाठी प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस,अभिमत विद्यापीठ आपणास आज जागतिक महिला दिनानिमित्ताने सन्मानीत करत आहे.

आपण स्त्रीशिक्षण व सबलीकरणाकडे विशेष लक्ष पुरविले व स्त्रीविषयक सुधारणेच्या अघोषित कार्यकर्त्या हया नात्याने प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळाची स्थापना करून आजूबाजूच्या उपेक्षित स्त्रियांना भक्कम आधार देण्याचे कार्य आपण करत आहात. स्त्रियांच्या जीवनात रचनात्मक बदल करावयाचा असेल तर त्यांनी पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यवसायिक शिक्षणासही प्राधान्य दिले पाहिजे अशा संकल्पनेतुन महिलांना व्यवसायिक शिक्षण उपलब्ध केले. आर्थिक स्वावलंबनासाठी लघुउद्योग व कुटीरउद्योगाचे प्रशिक्षण दिले. महिला बचतगटांची निर्मिती केली . जाणिवजागृती मेळावे भरविले. पतसंस्थेच्या माध्यमातून माफक दरात कर्ज उपलब्ध करुन दिले. परिणामी मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांना व्यवसायाची संधी मिळाली. स्त्रीच्या सर्वांगीण विकासासाठीचे सर्वोत्तम उपाय व धोरणे राबवून त्याची फलश्रुती स्त्रियांपर्यंत पोहचविण्यात आपण कुठलीही कुचराई केली नाही.

ग्रामीण भागातील महिला सक्षम व स्वयंपूर्ण होण्यासाठी आपले कुशल संघटन व कल्पक नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळ, महिला पतसंस्था, लघु उद्योग व सार्वजनिक वाचनालयासारखे अनेक विकासाभिमुख उपक्रम इतरांना पथदर्शी ठरत आहेत.

अशा हया उदयमशील स्त्रीत्वाचा गौरव करण्यासाठी आणि आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस, अभिमत विद्यापीठ आपणास आज जागतिक महिला दिनानिमित्ताने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत करत आहोत. आपण हया पुरस्काराचा स्वीकार करावा , ही नम्र विनंती.

दिनांक : ८ मार्च २०१८

डॉ. वाय. एम. जयराज
प्र. कुलगुरू